9069

पत्र

क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनी/दर /     /फलो-४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५,
दि. १७/१०/२०१६

प्रति,

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

------------------------------------

**विषय : प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये सुधारीत व्हॅट दर ६ टक्के ने दरपत्रक भरणेबाबत..**

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे पत्र जाक्र/कृआ/फलो-४/कंपनीदर/९३७/२०१६ दि.१६.०९.२०१६
२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार -ब दि.१६/०९/२०१६
३. या कार्यालयाचे पत्र क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनी/दर /१०७७/फलो-४ दि.१४.१०.२०१६

राज्यात राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत, सुक्ष्म सिंचन संच वितरण करण्यासाठी, सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्याना सन २०१६-१७ करीता नोंदणी आयुक्तालयस्तरावरुन देण्यात आली आहे. नोंदणी करण्यासाठी निश्चीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती नुसार सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यांना ई-ठिबक आज्ञावलीत घटकांचे दर दि.१/०४/२०१६ ते १६/०९/२०१६ या कालावधीचे व्हॅट दर ५.५ टक्के या प्रमाणे व दि.१७/०९/२०१६ पासुन व्हॅट दर ६ टक्के या प्रमाणे दि. २०/१०/२०१६ पुर्वी भरण्यात यावेत असे संदर्भ क्र.०१ व संदर्भ क्र. ३ अन्वये कळविण्यात आले आहे.

सदर प्रकीयामध्ये अधिक स्पष्टता येण्याच्या दृष्टीकोनातुन खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. ई-ठिबक आज्ञावलीत दर भरतांना दि.१/०४/२०१६ पासुन व्हॅट दर ५.५ टक्के या प्रमाणे घटकांचे दर भरण्यात यावेत.
२. वरील प्रमाणे दि.१/०४/२०१६ या कालावधीचे दर भरल्यानंतर आयुक्तालय स्तरावरुन त्यास मान्यता देण्यात येईल.
३. मान्यता प्रदान केल्यानंतर दि.१/०४/२०१६ चे सेलींग प्राईस (Selling Price) सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीने भरावेत.
४. पुन्हा ई-ठिबक आज्ञावलीत सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीने दि.१७/०९/२०१६ पासुन व्हॅट दर ६ टक्के या प्रमाणे घटकांचे दर भरण्यात यावेत.
५. वरील प्रमाणे दि.१७/०९/२०१६ पासुन चे दर भरल्यानंतर आयुक्तालय स्तरावरुन त्यास मान्यता देण्यात येईल.
६. मान्यता प्रदान केल्यानंतर सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीने सेलींग प्राईस (Selling Price) भरावेत.

वरीलप्रमाणे दोन वेळेस घटकाचे दर भरल्यानंतर दोन वेळेस स्वंतत्रपणे आयुक्तालयस्तरावरुन मान्यता देण्यात येईल. घटकाचे दर भरण्याची प्रकीया दि. २०/१०/२०१६ पुर्वी पुर्ण करण्यात यावी..

ई-ठिबक आज्ञावलीत मान्यता दिलेले दिनांकीत दर पत्रक हार्ड कॉपीत या कार्यालयास सादर करण्यात यावे.

**कृषि संचालक (फलोत्पादन)**
**कृषि आयुक्तालय,पुणे**

D:\AAGE\DRIP 2016-17\COMPANY\company correpondance.docx